**सं.फौ. ख. क्र.५३८/२०२३.**
**सरकार वि. उत्तम**
**निशाणी क्रमांक – २२.**

**सरकार तर्फे साक्षीदार क्रं. ०२ यांची जबानी**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करितो की,

**माझे नाव** - रोहीत रतन पाठक,
**वय** – ३४ वर्षे, **व्यवसाय** - सॉफटवेअर इंजिनिअर,
**राहणार** - सध्या ऑस्ट्रेलिया.

**सरतपास सरकार तर्फे अधिवक्ता श्रीमती. एम.एम. राउत यांच्यातर्फे**

**०१.** मी आरोपी याला ओळखतो. ज्या दिवशी अपघात झाला त्यादिवशी बघितले होते. घटना दि.१७.०५.२०२३ रोजी विला ४४ रेस्टॉरेंटच्या समोर दुपारी १ ते १.३० च्या मध्ये घडली होती. माझ्या वडिलांचे देवलापार येथे शेत आहे. तेथे आम्ही गेलो होतो. मला भूक लागल्याने मी विला ४४ हॉटेलमध्ये गेलो होतो. त्यावेळेस लगभग १ वाजला होता व मी हॉटेलमधून जेवण करून बाहेर आलो. मी देवलापार करीता माझी गाडी क्रं.एम.एच.-३१/एफ.यू.-०२९४ या गाडीने परत शेतात जात होतो. मी हायवे वर थांबलो होतो व डाव्याबाजूला वळू की नाही याबाबत सहानिशा करीत असतांना मला उजव्या बाजूला कोणतीही गाडी येतांना दिसली नाही म्हणून मी वळण घेतला त्यावेळेस रॉग साईडने आरोपी बलेरो पिकअप गाडी घेवून आला व त्याने माझ्या गाडीला धडक दिली व त्यामुळे माझ्या गाडीचे पुर्ण नुकसना झाले.

**०२.** त्यानंतर सदर गाडीसमोर जावून थोडया अंतरावर थांबली व गाडीतील डायव्हर बाहेर आला. सदर गाडी आरोपी हा चालवित होता. मी त्याच्याकडून लायसन्स मागितले. त्यानंतर आरोपी याने त्याच्या मालकाला कॉल केला व आम्ही पोलिस स्टेशनला गेलो. मला अपघात काही लागले नव्हते. माझ्या गाडीचे अंदाजे ६० ७० हजाराचे नुकसान झाले होते. पोलिस स्टेशन येथे जावून मी रिपोर्ट दिली व त्यावर वरून प्रथम खबर दाखल केली. आता मला दाखविण्यात आलेले तोंडी रिपोर्ट व प्रथम खबर तिच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास अनु.क्रं.नि.क्रं. २३ व २४ देण्यात येते. सदर गाडी चालक न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण.

**उलट तपासणी आरोपीकरिता ॲड श्री एम.ए. गुप्ता यांचेमार्फत**

**०३.** तथाकथीत घटनेच्या दिवशी माझ्या गाडीत मी व माझे काका अशोक बावीसकर हे होते. अशोक बावीसकर हे माझ्या घरी काम करतात. हे म्हणणे खरे नाही की,

माझे वडीलांचे देवलापार येथे शेतात आमचे नेहमी येणे जाणे होते. हे म्हणणे खरे आहे की, रोडच्या ज्या बाजूला विला ४४ आहे त्याच बाजूने देवलापाल पोलिस स्टेशन आहे. विला ४४ पासून देवलापार पोलिस स्टेशन हे अंदाजे अर्धा किलो अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत घटना घडल्या नंतर देखील माझी गाडी ही चालू अवस्थेत होती व माझ्याच कब्जात होती. हे मला आठवत नाही की, विला ४४ या हॉटेलच्या समोर हायवे वर वळण घेण्याकरीता डिवायडरमध्ये जागा आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, विला ४४ याच्या समोरच्या बाजूला निमटोला गाव असून हायवे वरून निमटोला गावाकडे जाण्याकरीता एक रोड आहे. हे म्हणणे खरे आहे की, देवलापार ते विला ४४ पर्यंत दोन्ही बाजूने सर्वेस रोड आहे.

**०४.** पोलिसांना रिपोर्ट व बयाण देतांना मी असे सांगितले नव्हते की, मी देवलापार करीता माझी गाडी क्रं.एम.एच.-३१/एफ.यू.-०२९४ या गाडीने परत शेतात जात होतो व मी हायवे वर थांबलो होतो व डाव्याबाजूला वळू की नाही याबाबत सहानिशा करीत असतांना मला उजव्या बाजूला कोणतीही गाडी येतांना दिसली नाही म्हणून मी वळण घेतला. पोलिसांना रिपोर्ट देतांना असे सांगितले होते की, गाडीचे पूर्णपणे नुकसान झाले होते, तसेच गाडी थोडया अंतरावर जाऊन थांबली व मी त्याच्याकडून लायसन्स मागितले व त्याने मालकाला बोलविले. हे म्हणणे खरे आहे की, सदर बाब माझ्या बयाणामध्ये किंवा तोंडी रिपोर्ट मध्ये नमुद नाही. सदर बाब माझ्या बयाण व तोंडी रिपोर्ट मध्ये का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर घटना घडली नव्हती म्हणून याबाबत माझ्या तोंडी रिपोर्ट व बयाणात नमुद नाही.

**०५.** माझ्या गाडीच्या उजव्या बाजूला धडक लागली होती. माझ्या गाडीचे इंशुरनस होते. माझ्या गाडीचे झीरो डेबट इंशुरनस नव्हते. मला पुर्ण नुकसान भरपाई इंशुरनस कंपनीकडून मिळाली नाही.

**०६.** हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत आहे त्याप्रमाणे कोणत्याही बुलेरो पिकअप गाडीने रॉग साईडने येवून माझ्या गाडीने धडक दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत आहे त्याप्रमाणे कोणताही अपघात घउलेला नाही व माझ्या गाडीचे कोणतेही नुकसान झाले नाही. हे म्हणणे खरे नाही की, गाडीचा इंशुरन्स क्लेम मिळण्याकरीता खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी विरूध्द खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
सही/-
(श्रीमती. डी. एस. सैंदाणे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं.२, रामटेक

रामटेक
दिनांक -१३/०३/२०२५.